विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ: -१. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विकवि-१२११/प्र.२९१/वि.प्र.४/मंत्रालय, मुंबई दि. १८.११.११

२. या कार्यालयाचा आदेश क्र. अविआ/ म.रा. / कार्या.निहाय पदे/ पुनर्रचना कक्ष /प्र.क्र.५८ /ब-३७८ दि. ०१/१२/२०११

३.या कार्यालयाचा आदेश क्र. अविआ/ म.रा. / कार्या.निहाय पदे/ पुनर्रचना कक्ष /प्र.क्र.५८ /ब-४०० दि. ११/०१/२०१२.

४. परिपत्रक क्र. No. JCST / HQ-7 / Restructuring /Adm. Insturction / 2015 /B-1 Dt. 07/12/2015.

५. शासन निर्णय, क्रमांक विकवि-१२१६/प्र.क्र.४/वि.प्र.४, दि. २४/०१/२०१७.

६. या कार्यालयाचे पत्र क्र विविआ/आस्था-३/ पुनर्रचना / कार्या. स्थानां./ प्र.क्र.८७ ब- १० दि. ३/०४/२०१७

७. या कार्यालयाचा आदेश क्र.विविआ/आस्था-३/ पुनर्रचना / कार्या. स्थानां. / प्र.क्र.८७ दि. ०९.०५.२०१७

८. विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक JCST/VAT/KOP/ Desks Shifting /B-१६१ KOLHAPUR दि. १२.०५.२०१७

९. विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) कोल्हापूर यांचा दि. १६/०५/२०१७ चा ई-मेल.

## आदेश

क्र विविआ/आस्था-३/ पुनर्रचना / कार्या. स्थानां. / प्र.क्र.८७ मुंबई दिनांक- 19 MAY 2017

विषय:- कोल्हापुर विभागातील कोल्हापुर कार्यालयातून ११ विक्रीकर अधिकाऱ्यांची पदे सातारा, सांगली व रत्नागिरी या कार्यालयात स्थानांतरीत करण्याबाबत.

प्रस्तावना

१. दि. १ जानेवारी २०१६ पासून विक्रीकर विभागातील कार्यनिहाय प्रशासकिय संरचनेचा त्याग करुन, भौगोलीक प्रशासकिय संरचना अंगिकारण्यात आली आहे.

२. दिनांक ०१/०१/२०१६ पासून कार्यनिहाय ऐवजी भौगोलीक कार्यपध्दती अंमलात आणतांना खात्याची फेररचना (Restructuring) करण्यात आली आहे. या फेररचनेमध्ये संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकाद्वारे एकुण ९६१ विक्रीकर अधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून व्यापाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. हे करतांना कोल्हापुर विभागातील विक्रीकर अधिकाऱ्यांना व्यापाऱ्यांचे कार्यालयनिहाय असमान वाटप झालेले आहे. उदा: सातारा येथे प्रति अधिकारी १५४१ व्यापाऱ्यांची प्रकरणे तर कोल्हापुर येथे प्रति अधिकारी ७४८ व्यापाऱ्यांची प्रकरणे असे असमान वाटप झालेले आहे. या बाबींचा विचार करून कोल्हापुर कार्यालयातून ११ विक्रीकर अधिकाऱ्यांची पदे सातारा, सांगली व रत्नागिरी या कार्यालयात स्थानांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

३. संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील विक्रीकर अधिकाऱ्यांच्या पदांचे एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरण करण्यात येत आहे.

| अ.क्र | सध्याचा नोडल विभाग | कार्यालय | महाविकास संकेतांक | नवीन नोडल विभाग | नवीन कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-043 | कोल्हापूर | सातारा |
| २ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-012 | कोल्हापूर | सातारा |
| ३ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-023 | कोल्हापूर | सातारा |
| ४ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-BST-C-001 | कोल्हापूर | सातारा |
| ५ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-042 | कोल्हापूर | सांगली |
| ६ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-038 | कोल्हापूर | सांगली |
| ७ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-020 | कोल्हापूर | सांगली |
| ८ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-044 | कोल्हापूर | सांगली |
| ९ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-039 | कोल्हापूर | सांगली |
| १० | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-003 | कोल्हापूर | रत्नागिरी |
| ११ | कोल्हापूर | कोल्हापूर | KOL-VAT-C-004 | कोल्हापूर | रत्नागिरी |

४. अधिकाऱ्यांच्या पदांचे स्थानांतरण करतांना, प्रत्येक अधिकारी निहाय २ विक्रीकर निरीक्षक व १ कर सहायक यांच्या पदांचे देखील स्तंभ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयातून स्तंभ क्र. ६ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयात स्थानांतरण करण्यात येत आहे.

५. विक्रीकर अधिकाऱ्यांच्या, विक्रीकर निरीक्षकांच्या व कर सहायकांच्या पदांच्या स्थानांतरणामुळे, संदर्भ क्र. २ च्या आदेशासोबतच्या प्रपत्र-अ (कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्गनिहाय प्रपत्र) व प्रपत्र-ब (महाविकास सांकेतांक दर्शविणारे प्रपत्र) मधिल होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने सुधारित प्रपत्र-अ व ब स्वतंत्र आदेशाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

६. अधिकाऱ्यांच्या, विक्रीकर निरीक्षकांच्या व कर सहायकांच्या पदांच्या स्थानांतरणामुळे, संदर्भ क्र. ३ च्या आदेशासोबतच्या प्रपत्र-क (आहरण व संवितरण अधिकारी निहाय पद वाटप तक्ते) मधिल होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने सुधारित प्रपत्र-क स्वतंत्र आदेशाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

७. अधिकारी / कर्मचारी यांच्या पदांच्या एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात होणाऱ्या स्थानांतरणामुळे सेवार्थ प्रणालीत करावयाच्या बदलांबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे सुचना देण्यात येतील.

८. अधिकाऱ्यांची जी पदे, स्थानांतरीत करण्यात येत आहेत, त्या पदांना (महाविकास सांकेतांक) वाटप केलेली व्यापाऱ्यांची प्रकरणे (TIN) स्तंभ क्र. ३ मधील कार्यालयातील उर्वरीत नोडल विक्रीकर अधिकाऱ्यांकडे समप्रमाणात वाटप करण्याची कार्यवाही विक्रीकर सहआयुक्त (महाविकास), यांनी करावी. त्याच प्रमाणे

स्तंभ क्र. ६ मधील कार्यालयातील नोडल विक्रीकर अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेल्या प्रकरणांचे समप्रमाणात वाटप करावे.

९. अधिकाऱ्यांची पदे एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरीत होणार असल्याने, त्यानुसार महाविकास व SAP संगणक प्रणालीतील Desks व त्या अंतर्गातील TIN मध्ये योग्य ते बदल व अनुषंगीक कार्यवाही विक्रीकर सहआयुक्त (महाविकास) यांनी करावी.

१०. या बदलांमुळे होणारे प्रशासकीय शृंखलेतील (Hierarchy) बदल लक्षात घेवून विक्रीकर सहआयुक्त (महाविकास) यांनी अधिकारी व कर्मचारी यांच्या संबंधीत डेस्क मध्ये व त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांचे डेस्क यांत महाविकास प्रणालीवर व SAP संगणक प्रणालीत यथोचित बदल करावेत.

११. या आदेशाची नोंद सर्व संबंधित नोडल विक्रीकर सहआयुक्त यांनी घ्यावी व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोडल विक्रीकर अधिकाऱ्यांमध्ये व्यापाऱ्यांच्या प्रकरणांचे (TIN) समप्रमाणात वाटप होईल यासाठी विक्रीकर सहआयुक्त (महाविकास) यांच्याशी समन्वय साधावा.

१२. या आदेशाची अंमलबजावणी **१ जुन, २०१७** पासून करण्यात यावी.

विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत सादर,

१. मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र-१ मुंबई
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई
६. सचिव (वित्त सुधारण), मंत्रालय, मुंबई
७. उपसचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

प्रत:-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. सर्व अप्पर विक्रीकर आयुक्त,
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई व बांद्रा.
६. विक्रीकर सहआयुक्त (महाविकास), यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७. आयुक्तांच्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी (आस्थापना) २, ३, ४, ५ व ६.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.